मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत समारंभ ४ फेब्रुवारीला पदवी ग्रहण करु इच्छिणाऱ्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना उपस्थिती नोंदणी ऑनलाईन करणेचे आवाहन >>पान 2

मुख्यमंत्री फडणवीस, केंद्रीयमंत्री गडकरी, सरसंघचालक भागवतांनी केले मतदान >>पान 3

'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाला सुरुवात >>पान 4

**सुविचार**

विश्वासामुळे माणसाला बळ येते.
– आचार्य विनोबा भावे


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 160 ■ शुक्रवार, दि. 16 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




राणी मुखर्जीनं केली चित्रपटसृष्टीत ३० वर्ष पूर्ण, पोस्ट झाली व्हायरल...

आतील पान

# ठाकरे बंधूंना जोरदार धक्का!:मुंबईत सत्तापालट होणार

## भाजप-शिवसेना सत्तेत येणार; महापालिका निवडणुकीचा एक्झिट पोल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जनमतच्या एक्जिट पोलनुसार मुंबईत सत्तापालट होणार असल्याचे म्हटले आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला १३८ जागा मिळणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. तसेच शिवसेन ठाकरे गट, मनसे आणि शरद पवार गटाला ६२ जागा मिळणार असल्याचे बोलले जात आहे. तसेच काँग्रेस-वंचितला २० तर इतरला ७ जागा मिळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मुंबई महापालिकेवर सर्वच राजकीय पक्षांचे विशेष लक्ष होते. याच महापालिकेच्या निवडणुकीसाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. राज ठाकरे यांनी मराठीचा मुद्दा उपस्थित करत मराठी माणसाला भावनिक साद घालण्याचा प्रयत्न केला होता. तसेच ठाकरे बांधूंच्या सभांना लोकांनी चांगलाच प्रतिसाद दिला होता. परंतु, एक्जिट पोल वेगळे आकडे दाखवत असल्याचे दिसून येत आहे.

रुद्र रिसर्चनुसार, मुंबईत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला १२१ जागा मिळतील. तर शिवसेना ठाकरे गट आणि मनसे युतीला ७१ जागा मिळतील. काँग्रेस आणि वंचितच्या आघाडीला मुंबईत २५ जागा मिळतील, तर इतरांना १० जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

सामच्या एक्झिट पोलनुसार वसई विरारमध्ये भाजपला २७, शिवसेना शिंदे गटाला ५, काँग्रेसला ३, शिवसेना ठाकरे गटाला ७, वंचितला ७२ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेमध्ये शिवसेना शिंदे गटाला ५७ जागा मिळण्याची शक्यता आहे. भाजप ४२ जागांवर विजय मिळण्याची शक्यता आहे. मनसे ६ जागांवर, काँग्रेस २ जागांवर, शिवसेना ठाकरे गट २ जागांवर, राष्ट्रवादी काँग्रेस २ जागांवर, वंचित बहुजन आघाडी २ जागांवर आणि इतर ६ जागांवर विजयी होण्याची शक्यता आहे.



उल्हासनगरमध्ये भाजपाला २८, शिवसेना शिंदे गटाला २९ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला ४ जागा मिळू शकतात. तसेच इतरांच्या स्थानिक जागा आहेत त्यांना १२, काँग्रेसला २, शिवसेना ठाकरे गटाला १, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला १५, तर मनसेला २ जागा मिळण्याची शक्यता दर्शवण्यात आली आहे.

पिंपरीचा देखील एक्जिट पोल समोर आला असून इथे देखील भाजपला जास्त मते मिळत असल्याचा अंदार प्राबने वर्तवला आहे. प्राबने दिलेल्या आकडेवारीनुसार पिंपरीमध्ये भाजपला २४, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ५१, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ९ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर शरद पवार गटाला २, शिवसेना ठाकरे गटाला शून्य, मनसेला एक तर वंचितला शून्य जागा मिळणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

प्राबनुसार पुण्यात भाजपला ९३, शिवसेना शिंदे गटाला ६, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ४३ जागा मिळणार असल्याचा अंदाज आहे. तसेच शिवसेना ठाकरे गटाला ७, शरद पवार गटाला ८, काँग्रेसला ८ आणि मनसेला शून्य जागा मिळणार असल्याचा अंदाज प्राबने वर्तवला आहे.

जेडीएसच्या एक्झिट पोलनुसार, कोल्हापुरात भाजपला २९-३२, शिवसेना शिंदे गटाला १८-२१, राष्ट्रवादी अजित पवार गटाला ९-११ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर काँग्रेसला १९-२३, शरद पवारांच्या राष्ट्रवादीला ०-१, शिवसेना ठाकरे गटाला ३-४, मनसेला ०-१, तर इतरांना २-४ जागा मिळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## यापूर्वीही अनेक वेळेला मार्कर पेन वापरला; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची स्पष्ट भूमिका

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व कुटुंबासह मतदानाचा हक्क बजावलेला आहे. मतदानाला येताना त्यांनी शासकीय गाडीचा वापर टाळला आहे. ते स्वत:च्या गाडीने मतदान केंद्रात आले होते. यावेळी मुख्यमंत्र्यांची पत्नी अमृता आणि मातोश्री सरिता फडणवीस यांनीसुद्धा मतदान केले.

स्थानिक स्वराज्य संस्था ही लोकशाहीचा पाया आहे, यात जास्तीत जास्त मतदान केलं पाहिजे. मतदान फक्त अधिकार नाही, तर कर्तव्यसुद्धा आहे. मतदान टाळणे म्हणजेच लोकशाहीत आपल्या कर्तव्याचा पालन न करण्यासारखे असल्याचे ते म्हणालेत. भरघोस मतदान करा, चांगले लोक निवडा, जर चांगली शहरं निर्माण करायची असल्यास २९ महानगरपालिकांच्या मतदारांनी जोरात मतदान करावे, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलंय.

अतिशय वाईट पद्धतीने आमचे उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर हल्ला करण्यात आलाय, त्यांचा हात फ्रॅक्चर झाला आहे. लोकशाहीत निवडून येता येत नाही म्हणून ठोकशाही करायची त्याचा हा प्रकार आहे. मात्र, कितीही हल्ले केले तरी आमचे कार्यकर्ते घाबरणार नाही.

राज ठाकरे यांनी बोटाला लावल्या जाणाऱ्या शाईवर प्रश्न निर्माण केलेत, यावर मुख्यमंत्री म्हणाले की, सर्व गोष्टी निवडणूक आयोग ठरवतो, यापूर्वीही अनेक वेळेला मार्कर पेन वापरला आहे. याबद्दल ऑब्जेक्शन असेल तर इलेक्शन कमिशनने याकडे लक्ष द्यावं. काही लोक उद्याचा निकाल अंदाज घेऊन नंतर काय प्रतिक्रिया द्यायची याची तयारी करीत आहे. महाराष्ट्रात केवळ आणि केवळ विकास चालेल, महाराष्ट्राची जनता विकासाच्या पाठीशी आहे. जनता विकास डोळ्यांसमोर ठेवून मतदान करेल, असा विश्वास आहे.

## पुण्यात पोलिसांनी अडवलं पांढऱ्या रंगाचं पिकअप; झडती घेताच लावला डोक्याला हात, १६ लाखांची ती वस्तू जप्त

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या धडक मोहिमेत वाघोली पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. केसनंद रस्त्यावर सापळा रचून विनापरवाना विदेशी दारूची वाहतूक करणारी पिकअप गाडी जप्त करण्यात आली असून, पोलिसांनी एकूण २३ लाख ७३ हजार ८४५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अशी झाली कारवाई: १३ जानेवारी रोजी वाघोली पोलीस ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत होते. यावेळी वाघोली ते केसनंद रस्त्यावरून एका पांढऱ्या रंगाच्या पिकअप गाडीतून मोठ्या प्रमाणात विदेशी दारूची तस्करी होणार असल्याची खात्रीशीर माहिती पोलीस उपनिरीक्षक मनोज बागल यांना मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार, पथकाने तातडीने सापळा रचला आणि संशयास्पद वाहन अडवून त्याची झडती घेतली.

या झडतीदरम्यान पोलिसांना गाडीत विदेशी दारूच्या तब्बल ७ हजार ४४१ बाटल्या आढळल्या, ज्यांची बाजारपेठेत किंमत १६ लाख ७६ हजार ८४५ रुपये आहे. यासोबतच दारू वाहून नेण्यासाठी वापरलेली ७ लाख रुपये किमतीची पिकअप गाडीही पोलिसांनी जप्त केली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी गायींना चारा घालत आहेत.

## शाई पुसून गैरकृत्य करणाऱ्यास पुन्हा मतदान करता येणे शक्य नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** बोटावर लावण्यात आलेली शाई पुसण्याचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे गैरकृत्य आहे. त्याचबरोबर बोटावरची शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदान करण्यासाठी आल्याचे आढळल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

बोटावरची शाई पुसून कोणी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला तरी संबंधित मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही, याबाबतची दक्षता यापूर्वीच घेण्यात आली आहे. मतदाराने मतदान केल्यानंतर त्याबाबत नोंद घेण्यात आलेली असते. त्यामुळे केवळ शाई पुसून गैरकृत्य केलेल्या मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही. याबाबत सतर्कता बाळगण्याच्या सूचना पुन्हा एकदा सर्व संबंधिताना देण्यात आल्या आहेत.

मतदाराच्या बोटाला शाई लावण्याकरिता मार्कर पेनच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाने १९ नोव्हेंबर २०११ रोजी आणि २८ नोव्हेंबर २०११ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. तेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासाठी मार्कर पेनचा वापर केला जात आहे. या आदेशानुसार मतदाराच्या बोटावर ठळकपणे उमटेल, अशा पद्धतीने मार्कर पेनने शाई लावण्यात यावी; तसेच नखावर आणि नखाच्या वरच्या बाजुला त्वचेवर तीन- चार वेळा घासून शाई लावावी, अशा सूचना यापूर्वीदेखील देण्यात आल्या असून आणि त्या मार्कर पेनवरही नमूद केल्या आहेत. त्यामुळे शाई पुसण्याचा प्रयत्न करण्याचे गैरकृत्य करू नये, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

बोटावरील शाई पुसली जात असल्याचे महानगरपालिका आयुक्त यांनी मान्य केल्याच्या वृत्तात तथ्य नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६ साठी मतदान केल्यानंतर बोटावरील शाई पुसली जात असल्याचे वृत्त विविध माध्यमांतून प्रसारित होत आहे. महानगरपालिका आयुक्त यांनी ही बाब मान्य केल्याचेही या वृत्तात सांगितले जात आहे.

याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात येत आहे की, मतदानानंतर बोटावरील शाई पुसली जात असल्याबाबत महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी कोणत्याही प्रकारचे विधान अथवा वक्तव्य केलेले नाही. त्यामुळे, माध्यमांत प्रसारित होणाऱ्या वृत्तात कोणतेही तथ्य नाही.

## नवी मुंबईतील सीबीडीमध्ये अपक्ष उमेदवाराच्या पतीच्या कारची तोडफोड

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईसह राज्यातील २८ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) मतदान होत आहे. महानगरपालिका निवडणुकीसाठी सकाळी ७.३० वाजेपासून मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे. दरम्यान नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सीबीडी प्रभाग क्रमांक '२८' मध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार दीपाली घोलप यांचे पती सुदीप घोलप यांच्या चारचाकी वाहनाची तोडफोड केल्याचा प्रकार मध्यरात्री घडला.

शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार दीपाली घोलप यांचे पती सुदीप घोलप यांच्या चारचाकी वाहनाची तोडफोड १४ जानेवारीच्या मध्यरात्री साडेतीनच्या दरम्यान घडली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी दगडाच्या सहाय्यानं दीपाली घोलप यांच्या घरासमोर उभी असलेल्या चारचाकीची तोडफोड केली. यानंतर त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला.

दीपाली घोलप यांचा कुणावर संशय? : ''भाजपाचे बेलापूर प्रभाग २७ मधील उमेदवार तेजस्वी म्हात्रे यांचे पती कुंदन म्हात्रे आणि सीबीडीतील उमेदवार यांनी हा प्रकार केला असावा. पूर्वीच्या काही वैयक्तिक गोष्टींचा राग मनात धरून कुंदन म्हात्रे यांनी सीबीडीमधील भाजपा उमेदवारांच्या मदतीनं ही तोडफोड केली असावी,'' असा संशय दीपाली घोलप यांनी व्यक्त केला आहे.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक : १५५ निवडणूक अधिकारी-कर्मचारी गैरहजर, गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** निवडणूक प्रक्रियेत नियुक्ती करूनही, कर्त्यव्यास हजर न होणाऱ्या तब्बल १५५ अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्यावतीनं देण्यात आली. १४ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजल्यापासून कर्तव्यावर हजर होणं बंधनकारक असताना देखील कुठलीही पूर्वकल्पना न देता अधिकारी, कर्मचारी गैरहजर राहिले. त्यामुळं छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका उपायुक्त उदय दिंगबर मानवतकर यांनी दिलेल्या तक्रारीनंतर सिटीचौक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, शहरातील एकूण १२६७ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबविण्यात येत असून त्यासाठी एकूण ५५८८ मतदान केंद्राध्यक्ष व पोलिंग अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तक्रारीनंतर गुन्हा दाखल : गुन्हा दाखल करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना १५ जानेवारीला नियुक्त मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया पूर्ण होऊन, दिलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात निवडणूक साहित्य जमा करेपर्यंत कर्तव्य लावलेले होते. महानगरपालिका आयुक्त यांचे लेखी आदेश असताना देखील निवडणूक कामी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेच्या कामकाजाकरिता हजर झालेले नाहीत. त्यामुळं शहरातील सिरीचौक पोलीस ठाणे इथं महानगरपालिका उपायुक्त उदय मानवतकर यांनी दिलेल्या तक्रारीनंतर मतदान प्रक्रियेत गैरहजर राहणाऱ्या १५५ जणांवर कलम १३४ लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.



या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

१. पांडुरंग विठ्ठलराव देशतवाड, पंचायत समिती फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर

२. अनिल श्रीराम परदेशी, पंचायत समिती फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर

३. कांचन हरीभऊ कायंदे, रानाजी मंगल कार्यालय वैशालीनगर,एन.८ सिडको, छत्रपती संभाजीनगर

४. कृष्णा रामराव शिंदे, पंचायत समिती फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर

५. भरत दादाराव कुडले, नगर पंचायत, फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर

६. भगवान फकीरचंद होनमाळी, नगर पंचायत फुलंब्री,

>>पान २



## भारत-इस्त्रायल उभय देशातील मैत्री आशादायी

भारत आणि इस्त्रायल या देशांमधील मैत्री केवळ राजकीय नसून, ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक तसेच भू-राजनैतिक अशा विविध पातळीवर नवे वळण घेत आहे. नववर्षाच्या प्रारंभी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानेहू त्यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क केला आणि याप्रसंगी त्यांनी दहशतवादाच्या विरोधात समान भूमिकेवर भर दिला. जगात कुठेही असो, दहशतवादाच्या बाबतीत शून्य सहिष्णुता हे सूत्र घेऊन दोन्ही देशांनी आता दमदार वाटचाल सुरू केली आहे. बदलत्या काळाच्या प्रवाहात दोन्ही देशांतील राजकीय संबंधांना नवी प्रगल्भता येत आहे. कारण अस्थिर आणि अनिश्चित अशा वातावरणातील जगामध्ये कोणतेही दोन देश जेव्हा समान हेतू व समान उद्दिष्टे समोर ठेवून एकत्र येतात, तेव्हा त्यांच्या मैत्रीला एक नवा संदर्भ प्राप्त होतो. भारताला पाकिस्तान व चीन या शेजारी देशांकडून सततचे धोके एखाद्या धक्क्यांप्रमाणे जाणवतात, तेव्हा या धोक्यांशी सामना करताना विश्वासार्ह आणि जबाबदार असा मित्र आवश्यक असतो. इस्त्रायलने भारताला प्रगतयुद्ध तंत्रज्ञान तसेच अद्ययावत गुप्तहेर यंत्रणा याबाबतीत सातत्याने सहाय्य केले आहे तसेच भारत कृषी, विकास, लघुउद्योग आणि शिक्षण व संशोधन या क्षेत्रांतसुद्धा दोन्ही देशांत अव्वल दर्जाचे आदान-प्रदान घडून येत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी इस्त्रायलच्या नेत्यांशी केलेली चर्चा ही खरोखरच नवे वळण देणारी ठरली आहे. नवीन आशादायी चित्र उभय देशातील मैत्रीमध्ये एक नवे आशादायी चित्र निर्माण झाले आहे. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या दूरध्वनी संभाषणातून समोर आलेले काही प्रमुख मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आहेत. मैत्रीच्या सुगंधी फुलांना नवा बहर आला आहे. जणू या मैत्रीला वसंताची चाहूल लागली आहे. नववर्षाच्या प्रारंभी पहिल्याच आठवड्यात उभय नेत्यांनी दूरध्वनीवर केलेली ही चर्चा खरोखरच आशादायी चित्र निर्माण करणारी आहे. भारत आणि इस्त्रायलमध्ये धोरणात्मक भागीदारीच्या दृष्टीने आजवरच्या इतिहासाचा धांडोळा घेता असे दिसते की, वर्तमान काळ हा खरोखरच उत्कर्षाचा नवा बिंदू आहे. उभय देशांतील धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यावर आणि लोकशाही मूल्ये आणि तत्वे यावर विश्वासाने भर देण्यासाठी ही चर्चा फलदायी ठरली आहे. संविधानावर आधारित लोकशाही आणि कायद्याचे राज्य यावर दोन्ही देशांचा प्रगाढ विश्वास आहे. त्यामुळे आशिया खंडातील सत्ता समतोलात दोन्ही देशांची भूमिका परस्परपूरक आणि तेवढीच विलक्षण हितवर्धक अशी राहिली आहे. दोन्ही देशांनी सामायिक प्राधान्ये ओळखली आहेत तसेच उभयतांनी समान लोकशाही मूल्ये, सखोल परस्पर विश्वास तसेच भविष्याकडे पाहण्याची तेजस्वी दृष्टी यावर आधारित नवी बांधणी करण्याचा संकल्प केला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणत्याही दोन देशांचे संबंध हे परस्पर हितसंबंधांचे रक्षण करण्याच्या मूलभूत तत्त्वांवर आधारलेले असतात. परंतु, वर्तमान असमतोल, स्फोटक प्रादेशिक परिस्थिती आणि आर्थिक तसेच लष्करी क्षेत्रांतील घडामोडी यांमुळे दोन्ही देशांना परस्पर हितरक्षणासाठी समीप येणे अपरिहार्य बनले आहे. पंतप्रधान नेत्यानेहू यांनी गाझा शांतता योजनेच्या अंमलबजावणीबद्दल केलेल्या कामगिरी संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे अभिनंदन केले. नेत्यानेहू यांनी त्यांना या शांती योजनेची माहिती दिली व त्यातील प्रगतीवर प्रकाश टाकला, तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या प्रदेशात न्याय आणि शाश्वत शांतता प्रस्थापित करण्यासाठी इस्त्रायलने घेतलेल्या भूमिकेचे समर्थन करून भारताचा त्यांना सबळ पाठिंबा घोषित केला. पश्चिम आशियातील वाढते तणाव, आखाती देशांमधील परस्पर स्पर्धा आणि डावपेच यामुळे परिस्थिती दोलायमान होत असताना इस्त्रायलच्या खंबीर भूमिकेमुळे शांतता प्रस्थापनेला एक नवी बैठक प्राप्त होत आहे. आशियाच्या राजकारणात भारत-इस्त्रायल मैत्री ही सत्ता संतुलनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. कारण आशियातील शांतता आणि स्थैर्य हाच विकासाचा खरा आधार आहे, हे लक्षात घेऊन दोन्ही नेत्यांनी आपल्या देशांतील जनतेला, लोकसमुदायाला शांती आणि समृद्धीच्या फलप्राप्तीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यामागे शांतता हाच समृद्धीचा पाया आहे, हे सूत्र लपलेले आहे. संपूर्ण जगातील लोकशाहीला आज दहशतवादाचे खग्रास ग्रहण लागले आहे. एखाद्या राहू-केतू प्रमाणे पाकिस्तान-तुर्कस्तान यासारखे देश जगामध्ये अस्थिरता माजवत आहेत. खुद्द अमेरिका असो, रशिया असो की, इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड अशा सर्व देशांमध्ये दहशतवादी कारवायांनी तेथील सामाजिक जीवनात अनेक बिकट प्रश्न निर्माण केले आहेत तसेच जगातील शाश्वत विकासालासुद्धा या दहशतवादाच्या संकटामुळे ग्रासले आहे. गेल्या वीस वर्षांत किमान जागतिक जीडीपीच्या विकासात तीन ते पाच टक्के घट या विनाशकारी दहशतवादी अपप्रवृत्तींमुळे झाली आहे. त्यामुळे दहशतवादाच्या विरोधात दोन्ही देशांनी समान पवित्रा घेतला आहे. जगाला त्रस्त करणाऱ्या दहशतवादाच्या विरोधात शून्य सहिष्णुता हे दोन्ही देशांचे समान धोरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बेंजामिन नेत्यानेहू यांनी शून्य सहिष्णुता देण्याच्या धोरणाच्या वचनबद्धतेचा पुन्हा एकदा जबरदस्त पुरस्कार केला आहे. इस्त्रायलने हमास आक्रमणाशी शर्थीने झुंज दिली तसेच प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या देशाच्या कृषी, औद्योगिक व शैक्षणिक विकासाचा वेग मंदावू दिला नाही. त्यामुळे या देशातील नेतृत्वाचे तसेच लोकांच्या प्रतिकारशक्तीचे कौतुक केले पाहिजे. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने मध्यरात्री केलेल्या आक्रमणामुळे गोंधळून न जाता इस्त्रायलने ज्या पद्धतीने दहशतवादाचा बिमोड केला, तो जगभर या देशाच्या पराक्रमाचा आणि सामर्थ्याचा लौकिक उंचावणारा ठरला. इस्त्रायलच्या पहिल्या महिला पंतप्रधान गोल्डामीयर असे म्हणत असत की, इस्त्रायलचा जो काही भूप्रदेश इतर देशांनी लाटला आहे, तो परत मिळविणे आणि इस्त्रायलला अखंड देश बनवणे हे त्यांचे स्वप्न होते. आता नेत्यानेहू त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी निकराचा प्रयत्न करत आहेत. छळाकडून बळाकडे प्रवास केलेल्या इस्त्रायलची इतिहासाकडे बघण्याची दृष्टी खरोखरच विलक्षण आहे. त्यांनी माळरानावर नंदनवन फुलविले आहे आणि खडकाळ प्रदेशात हरितक्रांती घडवून आणली आहे. लोकांच्या अखंड, अभंग आणि जिवंत देशभक्तीमुळे असाध्य ते साध्य होऊ शकते आणि राष्ट्र जगाच्या इतिहासात सोनेरी पान लिहू शकते, हे इस्त्रायलने सिद्ध केले आहे. त्यामुळे भारत आणि इस्त्रायल या दोन्ही देशांतील इतिहासाचा प्रवाह समसमान आहे. अनेक शतकांच्या आक्रमणांशी सामना करत भारताने आपले सत्व आणि स्वत्व टिकविले आहे. आज राष्ट्र बलशाली महासत्ता होण्याच्या दिशेने झेपावत आहे. अशावेळी भारतही दोन्ही देशांना नवी उंची गाठण्यासाठी प्रेरक ठरू शकते. इस्त्रायलने हमासच्या आक्रमणाविरुद्ध केलेला निकराचा संघर्ष असो, की भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या विरोधात ऑपरेशन सिंदूरद्वारे आखलेली मोहीम असो. दोन्हींमध्ये एक समसमान सूत्र आहे ते असे की, दहशतवाद हा एक कर्करोग आहे. त्याची शस्त्रक्रिया योग्य वेळी केल्यास त्याचा नायनाट करता येतो. तथापि, प्रत्येक क्षणी प्रत्येक पावलावर सावध राहून पुढील संकटांशी सामना करणे, हे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे.

# मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत समारंभ ४ फेब्रुवारीला पदवी ग्रहण करू इच्छिणाऱ्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना उपस्थिती नोंदणी ऑनलाईन करणेचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत (पदवीप्रदान) समारंभ बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठ मुख्यालयात आयोजित करण्यात आला आहे. त्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी येत्या दिनांक २० जानेवारीपर्यंत आपल्या उपस्थितीची ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार हा दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला आहे. त्यात सन २०२४-२०२५ या वर्षात (डिसेंबर २०२४, मार्च २०२५ व मे/जून २०२५ ह्या परीक्षांमध्ये) उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. त्यास प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी https://31convocation.ycmou.ac.in/attendance या लिंकवर जाऊन आपल्या उपस्थिती बाबतची माहिती कृपया ऑनलाईन पद्धतीने भरावी. सदरची लिक ही दिनांक १४/०१/२०२६ ते दिनांक २०/०१/२०२६ या कालावधीत सुरू राहील व या कालावधीतच नोंदणी करता येईल. यास मुदतवाढ मिळणार नाही. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतरच दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करता येईल.



तसेच दीक्षांत समारंभच्या दिवशी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळेत विद्यापीठ मुख्यालयात हजर राहून व अनामत रक्कम रु. ५००/- (पाचशे रुपये) भरून विद्यार्थ्यांना दीक्षांत शाल घ्यावी लागेल. अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने आधी देखील भरता येईल.

अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरणेबाबत तसेच दीक्षांत समारोहासंबंधीची सर्व माहिती समारंभापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=28329 या लिंकवर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल. ती विद्यार्थ्यांनी पहावी. पीएच. डी. पदवीसाठी पात्र विद्यार्थ्यांची उपस्थिती गृहीत धरण्यात आलेली आहे. त्यांनी स्वत:च्या उपस्थितीची नोंद करू नये. ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या उपस्थिती बाबतची ऑनलाईन स्वीकृती नोंदवली आहे, त्यांनाच दीक्षांत समारोहाच्या दिवशी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. ज्यांनी नोंदणी केलेली नाही, त्यांची प्रमाणपत्रे दीक्षांत समारोहानंतर काही कालावधीत त्यांच्या अभ्यासकेंद्रामार्फत वितरीत केली जातील. त्यासाठी त्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. नोंदणी न करता दीक्षांत समारंभात आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे व परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

# लोकशाही उत्सवात सहभाग नोंदविणाऱ्या मुंबईकरांच्या सेवेसाठी म हानगरपालिकेचा सार्वजनिक आरोग्य विभाग तत्पर

**मुंबई/प्रतिनिधी :** बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आज सकाळी लोकशाहीच्या उत्सवास प्रारंभ झाला. ज्येष्ठ नागरिकांसह प्रथमच मतदार झालेले नव मतदार अत्यंत उत्साहाने या मतदान प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवीत आहेत. या मतदारांना आणि निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना काही वैद्यकीय गरज भासल्यास, वैद्यकीय मदत तत्काळ उपलब्ध व्हावी, या हेतूने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याच्या पुढाकाराने महानगरपालिका क्षेत्रातील मतदान केंद्रांच्या ठिकाणी प्राथमिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याकरिता वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि संबंधित वैद्यकीय कर्मचारी यांचा समावेश असलेल्या १ हजार ६७४ चमू कर्तव्य तत्पर आहेत, अशी माहिती महानगर पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याद्वारे देण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना कार्यकारी आरोग्य अधिकारी यांनी सांगितले की, म हानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे), अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनानुसार व उप आयुक्त (सार्वजनिक आरोग्य) शरद उघडे यांच्या नेतृत्वात बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील म तदान केंद्रांच्या ठिकाणी प्राथमिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ३ हजार ३०० पेक्षा अधिक वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या चमू कार्यरत आहेत. तसेच गरज भासल्यास गरजू रुग्णाला तत्काळ रुग्णालयात नेणे सुलभ व्हावी, यासाठी ८० रुग्णवाहिका देखील तैनात ठेवण्यात आल्या आहेत. प्राथमिक वैद्यकीय सेवा सुविधेच्या दृष्टीने आवश्यक असणारी औषधे, गोळ्या, इंजेक्शन्स इत्यादी देखील सर्व वैद्यकीय चमूंकडे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

त्याचबरोबर 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' हे देखील सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत कार्यरत आहेत. त्याचबरोबर बृहन्मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये, खासगी रुग्णालये इत्यादींना देखील वैद्यकीय सेवेच्या दृष्टीने तत्पर राहण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. या सर्व बाबींम ुळे आणि करण्यात आलेल्या विविध स्तरीय नियोजनामुळे गरजूंना तत्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध होत आहे, अशी ही माहिती बृहन्मुंबई म हानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे देण्यात येत आहे.

पान १ वरून...

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक : १५५ निवडणूक अधिकारी-कर्मचारी गैरहजर, गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर
७. गजानन त्रिंबक तावडे, नगर पंचायत फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर
८. मधेकर कृष्णा मुरलीधर, पंचायत समिती फ ुलंब्री, छत्रपती संभाजीनगर
९. सय्यदा आसरा जैदी इजाज अली, मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्ट सायन्स अँन्ड कॉमर्स,रोजेबाग, छत्रपती संभाजीनगर
१०. खान अब्दुल सत्तार करीम खान, बाजार गल्ली फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर
११. संतोष रामदास जाधव, पंचायत समिती फ ुलंब्री, छत्रपती संभाजीनगर
१२. राजेंद्र वामनराव जगताप, पंचायत समिती फ ुलंब्री, छत्रपती संभाजीनगर
१३. संजय पंडीतराव जोगदंड, पंचायत समिती फ ुलंब्री, छत्रपती संभाजीनगर
१४. दिलीप शेनफडू निकम, पंचायत समिती गंगापूर, छत्रपती संभाजीनगर
१५. संतोष चिंतामन अंबीलढगे, छत्रपती संभाजीनगर
१६. रमेश पंडीत ताठे, छत्रपती संभाजीनगर
१७. अनिल माधवराव दसरे, छत्रपती संभाजीनगर
१८. अविनाश आत्माराम शिंगणे, छत्रपती संभाजीनगर
१९. मुजोबोद्दीन तुराबोद्दीन शेख, छत्रपती संभाजीनगर
२०. पाटील सि.के. छत्रपती संभाजीनगर
२१. देशमुख एस.ए. छत्रपती संभाजीनगर
२२. भारत जनार्धन बोराडे, छत्रपती संभाजीनगर
२३. जितेंद्र लक्ष्मणराव कुलकर्णी, छत्रपती संभाजीनगर
२४. योगेश भास्कर थोटे, छत्रपती संभाजीनगर
२५. प्रविण व्यंकटराव देशमुख, छत्रपती संभाजीनगर
२६. विनोद भिमराव रबडे, छत्रपती संभाजीनगर
२७. मजीबोद्दीन नसीरोद्दीन, छत्रपती संभाजीनगर
२८. प्रदीप यशवंत पाटील, छत्रपती संभाजीनगर
२९. पी.बी.देवकाते, छत्रपती संभाजीनगर
३०. हेमलता गुलाबराव ठाकरे, छत्रपती संभाजीनगर
३१. डॉं. बीना कुमारी स्नेगर, छत्रपती संभाजीनगर
३२. कुंडलीक विठ्ठलराव राठोड, छत्रपती संभाजीनगर
३३. शेख जाकेर इसाक, छत्रपती संभाजीनगर
३४. रंजीतसिंहग कृष्णराव निंबाळकर, छत्रपती संभाजीनगर
३५. राजेश पृथ्वीराज राठोड, छत्रपती संभाजीनगर
३६. भगत बालाजी हनुमंत, छत्रपती संभाजीनगर
३७. दोंवंगावे प्रदीप गोवींदराव, छत्रपती संभाजीनगर
३८. रामेश्वर प्रभाकर विधाते, छत्रपती संभाजीनगर
३९. सुनील निवृत्ती शेरखाने, छत्रपती संभाजीनगर
४०. दिपक संतोषराव साळुंके, छत्रपती संभाजीनगर
४१. कार्तीक अंकुश चव्हाण, छत्रपती संभाजीनगर
४२. श्रीपात प्रकाशराव मुळे, छत्रपती संभाजीनगर
४३. किशोर विठ्ठलराव सिरसाठ, छत्रपती संभाजीनगर
४४. मनोज गजानन शेटे, छत्रपती संभाजीनगर
४५. डॉ.महादेव मुरारी गायकवाड, छत्रपती संभाजीनगर
४६. जयदत्त बाबूलाल शुक्ला, छत्रपती संभाजीनगर
४७. नागेश विनायकराव अंकुश, छत्रपती संभाजीनगर
४८. मुक्तार रतन पटेल, छत्रपती संभाजीनगर
४९. अनिल तुळशीराम गुले, छत्रपती संभाजीनगर
५०. रविंद्र रामदास शिंदे, छत्रपती संभाजीनगर
५१. संजय लक्ष्मण सावंत, छत्रपती संभाजीनगर
५२. सलाउद्दीन कुतूबुद्दीन शेख, छत्रपती संभाजीनगर
५३. तन्मय अरविंद पाथरीकर, छत्रपती संभाजीनगर
५४. प्रतिका भगवान बोराडे, छत्रपती संभाजीनगर
५५. सुनीता नरेंद्र चौधरी, छत्रपती संभाजीनगर
५६. दिनेश लक्ष्मणराव लिंगमपल्ले, छत्रपती संभाजीनगर
५७. सचीन जयवंतराव गाडेकर, छत्रपती संभाजीनगर
५८. डॉ.मकरंद अरविंद पैठणकर, छत्रपती संभाजीनगर
५९. अमोल रमाकांत साबळे, छत्रपती संभाजीनगर
६०. डॉ. मस्ताजबी अहमद मसोद्दीन खान, छत्रपती संभाजीनगर
६१. अविनाश सुरेश मुर्ते, छत्रपती संभाजीनगर
६२. निलेश प्रकाश साळवे, छत्रपती संभाजीनगर
६३. दत्तात्रय चंद्रकांत पर्वत, छत्रपती संभाजीनगर
६४. एन.एल. तजवी, छत्रपती संभाजीनगर
६५. दिलीप भानुदास फुंडे, छत्रपती संभाजीनगर
६६. परमेश्वर साळवे, छत्रपती संभाजीनगर
६७. व्यंकट शिकापुरे, छत्रपती संभाजीनगर
६८. राजेश शहाणे, छत्रपती संभाजीनगर
६९. पंकज शंकर राठोड, छत्रपती संभाजीनगर
७०. दिपा नविनचंद चौधरी, छत्रपती संभाजीनगर
७१. सचीन रंगनाथ चव्हाण, छत्रपती संभाजीनगर
७२. आर.एल.चव्हाण, छत्रपती संभाजीनगर
७३. मोहम्मद जहीर मोहम्मद बशीर, छत्रपती संभाजीनगर
७४. विजय मधुकर येवले, छत्रपती संभाजीनगर
७५. सुंदर पंडातराव मुंडे, छत्रपती संभाजीनगर
७६. श्रीकांत मारोती गायकवाड, छत्रपती संभाजीनगर
७७. डॉ. शत्रुंजय मृत्यूंजय कोटे, छत्रपती संभाजीनगर
७८. मुग्धा सुरेश पाटील, छत्रपती संभाजीनगर
७९. सुनील कोंडगी वाघ, छत्रपती संभाजीनगर
८०. डॉ.अर्चना संदीपान गिरी, छत्रपती संभाजीनगर
८१. सय्यद जलील उर रहेमान, छत्रपती संभाजीनगर
८२. राजेश्री प्रसाद अष्टेकर, छत्रपती संभाजीनगर
८३. अर्चना कडुबा पालकर, छत्रपती संभाजीनगर
८४. नारायण गणेशराव चोरमाळे, छत्रपती संभाजीनगर
८५. अनिरुध्द नागनाथराव वसमतकर, छत्रपती संभाजीनगर
८६. मनिषा रुस्तुमराम काळे, छत्रपती संभाजीनगर
८७. सुरेखा दत्तात्रय हरवाळे, छत्रपती संभाजीनगर
८८. अंबादास प्रभाकर कदम, छत्रपती संभाजीनगर
८९. निलेश बाळासाहेब बडे, छत्रपती संभाजीनगर
९०. शिवाजी रामचंद्र जाधव, छत्रपती संभाजीनगर
९१. मनिषा वसंतराव शिरसाट ,छत्रपती संभाजीनगर
९२. विकास रामचंद्र शिंदे, छत्रपती संभाजीनगर
९३. गिता मनोहर साखरे, छत्रपती संभाजीनगर
९४. खाजा मोईनोद्दीन नुर मोहम्मद शेख, छत्रपती संभाजीनगर
९५. दिलीप रामभाऊ वाघ, छत्रपती संभाजीनगर
९६. सुरेश मोतीलाल परदेशी, छत्रपती संभाजीनगर
९७. अजीत नथुजी दांडगे, छत्रपती संभाजीनगर
९८. निलीमा रंजीत राजपुत, छत्रपती संभाजीनगर
९९. सुधीर मनोहर आवटे, छत्रपती संभाजीनगर
१००. कृष्णा गवनाजी बोरसे, छत्रपत संभाजीनगर
१०१. सुरज देविदास जोशी, छत्रपती संभाजीनगर
१०२. किशोर लक्ष्मणदास वैष्णव, छत्रपती संभाजीनगर
१०३. लक्ष्मण प्रल्हादराव लाखोले, छत्रपती संभाजीनगर
१०४. अमर गणेशसिंग गौर, छत्रपती संभाजीनगर
१०५. राम गबरु चव्हाण, छत्रपती संभाजीनगर
१०६. पोपट रामकृष्ण सपकाळ, छत्रपती संभाजीनगर
१०७. श्रीकृष्ण बापूराव झाजन (), छत्रपती संभाजीनगर
१०८. बबन पांडुरंग पाटील, छत्रपती संभाजीनगर
१०९. प्रविण प्रेमदास बोबडे, छत्रपती संभाजीनगर
११०. मोतीराम चव्हाण, छत्रपती संभाजीनगर
१११. शेषराव संपतराव गर्जे, छत्रपती संभाजीनगर
११२. खान अशरफ खान युनूस खान, छत्रपती संभाजीनगर
११३. किरण विठ्ठल गांगुर्डे, छत्रपती संभाजीनगर
११४. भरत शिवराम पाटील, छत्रपती संभाजीनगर
११५. बाळासाहेब व्यंकटराव कोपळे, छत्रपती संभाजीनगर
११६. आदिनाथ तोताराम सुरासे, छत्रपती संभाजीनगर
११७. शैलेंद्र भिमसेन विटोरे, छत्रपती संभाजीनगर
११८. शेख मोबीन शेख शोएब, छत्रपती संभाजीनगर
११९. पठाण अब्दुल रहीम, छत्रपती संभाजीनगर
१२०. बुढाण गुलाब सय्यद , छत्रपती संभाजीनगर
१२१. अंकुश श्रीरंग हिवाळे, छत्रपती संभाजीनगर
१२२. चेतन नागनाथराव गावडे, छत्रपती संभाजीनगर
१२३. संभाजी भाऊसाहेब बनकर, छत्रपती संभाजीनगर
१२४. रमेश सुभाष पाटील, छत्रपती संभाजीनगर
१२५. भागीनाथ दादा सोनवणे, छत्रपती संभाजीनगर
१२६. किशोर नामदेव माळवे, छत्रपती संभाजीनगर
१२७. प्रमोद देवीदाल घोरपडे, छत्रपती संभाजीनगर
१२८. माधुरी मुंजीराम दलाल, छत्रपती संभाजीनगर
१२९. कल्पणा सुधाकर बच्चाव, छत्रपती संभाजीनगर
१३०. कल्पणा रामभाऊ जाधव, छत्रपती संभाजीनगर
१३१. मंदाकिनी विनायक काळे, छत्रपती संभाजीनगर
१३२. प्रतिभा तातेराव थोरात, छत्रपती संभाजीनगर
१३३. वैभव खेडकर, छत्रपती संभाजीनगर
१३४. तुषार पोहनीकर, छत्रपती संभाजीनगर
१३५. शोभा अहिरे, छत्रपती संभाजीनगर
१३६. मनोज अंधारे, छत्रपती संभाजीनगर
१३७. बाळासाहेब बडे, छत्रपती संभाजीनगर
१३८. कविता असोले, छत्रपती संभाजीनगर
१३९. सचीन रमेश साळवे, छत्रपती संभाजीनगर
१४०. गणराज देवराव उचीत, छत्रपती संभाजीनगर
१४१. वसंत पाटील, छत्रपती संभाजीनगर
१४२. जितेंद्र लक्ष्मण जाधव, छत्रपती संभाजीनगर
१४३. किरण लिंगराम शुरकांबळे, छत्रपती संभाजीनगर
१४४. लहू बाबूराव घुटे, छत्रपती संभाजीनगर
१४५. डॉ. रमेश प्रभाकरराव चोंडेकर, छत्रपती संभाजीनगर
१४६. बाबासाहेब सावळीराम जाधव, छत्रपती संभाजीनगर
१४७. वसंत श्यामराव बर्वे, छत्रपती संभाजीनगर
१४८. नितीन रामेशवर तागडे, छत्रपती संभाजीनगर
१४९. दिपक मारोतीराव सोनवणे, छत्रपती संभाजीनगर
१५०. अब्दुल हसीब अब्दुल वहीद, छत्रपती संभाजीनगर
१५१. वैभव नामदेव सोनवणे, छत्रपती संभाजीनगर
१५२. अजय गणपत देशमुख, छत्रपती संभाजीनगर
१५३. शरीफ मोतीलाल शेख, छत्रपती संभाजीनगर
१५४. डॉ.नंदा चंदनराव देशमुख, छत्रपती संभाजीनगर
१५५. मनिष दत्तात्रय मोरे, छत्रपती संभाजीनगर.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुख्यमंत्री फडणवीस, केंद्रीयमंत्री गडकरी, सरसंघचालक भागवतांनी केले मतदान

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महापालिकेच्या ३८ प्रभागातील १५१ सदस्यांच्या निवडीसाठी आज गुरुवारी सकाळी मतदानाला सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धरमपेठ येथील मतदान केंद्रावर सहपरिवार मतदान केले. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, सरसंघचालक मोहन भागवत यांनी सकाळी मतदान केले. काही मतदान केंद्रावर इव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाल्याने उशिरा मतदान सुरु झाले. आज एक दिवस मतदार 'राजा' ठरत आहे. दिव्यांग मतदारांना ॲम्ब्युलन्सने मतदान केंद्रावर आणले जात आहे. लकडगंज झोममध्ये एका ज्येष्ठ दिव्यांग नागरिकाला ॲम्ब्युलन्सने आणण्यात आले. मतदानानंतर घरी सोडून देण्यात आले. मतदान केंद्रांवर एकूण ३ हजार पेक्षा जास्त कंट्रोल युनिट आणि जवळपास १० हजार बॅलेट युनिटचे लावण्यात आले आहे.काल बुधवारी उशिरा रात्रीपर्यंत मतदान केंद्रावर साहित्याची जुळवाजुळव करण्यात आली. मतदान केंद्रांवर रॅम्प, पिण्याचे पाणी, व्हिलचेअर, प्रथमोपचार किट आदींची सुविधा करण्यात आली आहे.

**मतदान केंद्र असे शोधता येईल**

महापालिकेचे संकेतस्थळ पूज्ैः. हस्म्हुज्ली्दन.ग्ह यावर 'आपले मतदान केंद्र' ही विंडो आहे. यावर क्लिक केल्यानंतर नावानुसार किंवा





मतदार ओळखपत्राच्या ईपीक क्रमांक नोंदवावा, त्याखाली मतदारांनी प्रभाग क्रमांक नमूद करायचा, यानंतर मतदाराला मतदान केंद्र दिसून येईल, याचवेळी डिटेल असा पर्याय उपलब्ध राहील, यावर क्लिक केल्यानंतर मतदान केंद्राचा नकाशा दिसून येईल. मनपाचे चॅटबॉट, एआय मित्र व माय नागपूर ॲपवर मतदान केंद्र तात्काळ शोधता येणार आहे. यासंदर्भात या डिजीटल प्लॉटफॉर्मवर महापालिकेने आपले मतदान केंद्र ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यात मतदारांना मतदार ओळखपत्रावर असलेले नाव किंवा मतदार ओळखपत्र क्रमांक (ईपीआयसी) नुसार शोधता येणार आहे. मतदाराला मराठी किंवा इंग्रजी भाषेचा नाव शोधण्यासाठी उपयोग करता येणार आहे. मतदारांनी ईपीक क्रमांकानुसार मतदान केंद्र शोधल्यास अधिक अचूक व तात्काळ माहिती मिळू शकेल.

**अपंग मतदारांकारिता विशेष सोय**

उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये अपंग मतदारांसाठी महापालिकेतर्फे विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अपंग मतदारांकारिता ९१७५४१४३५५ हा व्हॉट्सॲप क्रमांक निश्‍चित केला आहे. यावर लोकेशन शेअर केल्यानंतर मतदान बूथवर ये-जा करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत त्यांच्या निवास स्थानावरून मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये झोनल वैद्यकीय अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली एका वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी आणि वाहतुकीचे सुरळीत नियोजन करण्यासाठी शहर बस सेवेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. आज सकाळी ६:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत सर्व मुख्य मार्गावर आणि इनर रिंग रोडवर विशेष २५० बसेस धावतील. या कालावधीत विविध ठिकाणांहून येणाऱ्या बसेस फक्त शहराच्या 'ऑक्ट्रॉय' (नाका) हद्दीपर्यंत चालवल्या जातील. तर दुपारी १:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत बससेवा मर्यादित स्वरूपात राहणार आहे. शहरातील प्रमुख मार्गावर केवळ ५० बसेस कार्यान्वित राहणार आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी सर्व बसेसवर सुधारित मार्ग आणि गंतव्यस्थानांचे फलक स्पष्टपणे लावण्यात आले आहे.

**शुक्रवारी १ वाजेपर्यंत निकाल**

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर १० मतमोजणी केंद्राची स्थापना करण्यात आली असून शुक्रवारी (१६ जानेवारी) सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. साधारणत: प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे २० टेबल मतदान यंत्रासाठी तसेच पोस्टल बेलेट साठी ४ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक व एक सहायक नियुक्त करण्यात आले आहे. शुक्रवारी साधारणपणे १ वाजेपर्यंत निकाल मिळणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

प्रभाग : ३८ (३६ प्रभाग ४ सदस्य, एक प्रभागात ३ सदस्य)

सदस्य : १५१
एकूण मतदार : २४,८३,११२
पुरुष : १२,२६,६९०
महिला : १२,५६,१६६
इतर : २५६

एकूण उमेदवारांची संख्या : ९९३
भाजप : १४३
शिंदे शिवसेना : ८
काँग्रेस : १५१
राष्ट्रवादी (अजित पवार) : ८७
राष्ट्रवादी (शरद पवार) : ७९
बसप : ८२
आप : ६५
शिवसेना ठाकरे : २४

## आंध्र प्रदेशात रेल्वे अपघात! नेल्लोरमध्ये मालगाडीचे दोन डबे रुळावरून घसरले; रेल्वे वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता

नेल्लोर : आंध्र प्रदेशातील नेल्लोर जिल्ह्यातून रेल्वे अपघाताची एक मोठी बातमी समोर येत आहे. येथे एका धावत्या मालगाडीचे दोन डबे अचानक रुळावरून घसरल्याने (अीरग्त्सहू) मोठी खळबळ उडाली. या घटनेमुळे रेल्वे रुळांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, संबंधित मार्गावरील रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे.नेल्लोर जिल्ह्यातून जात असताना मालगाडीच्या डब्यांचा ताबा सुटला आणि दोन डबे रुळावरून खाली घसरले. अपघाताचा आवाज होताच रेल्वे कर्मचाऱ्यांनी ताडीने धोक्याचा इशारा दिला. घटनेची माहिती मिळताच रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी आणि तांत्रिक पथक घटनास्थळी दाखल झाले आहेत. सुदैवाने, ही मालगाडी असल्याने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

डबे रुळावरून घसरल्यामुळे रेल्वे ट्रॅकचे नुकसान झाले आहे. सध्या गॅस कटर आणि क्रेनच्या साहाय्याने घसरलेले डबे बाजूला करण्याचे काम सुरू आहे. या प्रक्रियेमुळे या मार्गावरून जाणाऱ्या काही प्रवासी गाड्यांच्या वेळापत्रकात बदल होण्याची किंवा काही गाड्या थांबवून ठेवण्याची शक्यता आहे. रेल्वे प्रशासनाकडून अद्याप अधिकृतरीत्या गाड्यांच्या रद्दबातल प्रक्रियेबद्दल माहिती देण्यात आलेली नाही. नव्या वर्षाच्या सुरुवातीपासूनच रेल्वे अपघातांच्या घटना वारंवार समोर येत आहेत. या महिन्याच्या सुरुवातीला, २ जानेवारी रोजी उत्तर प्रदेशातील निलगाव रेल्वे क्रॉसिंगजवळ वंदे भारत एक्सप्रेसचा मोठा अपघात थोडक्यात टळला होता. त्यावेळी रेल्वेला गुरे धडकल्याने इंजिनचा पुढचा भाग खराब झाला होता. सुदैवाने प्रवाशांना कोणतीही इजा झाली नव्हती. मात्र, नेल्लोरमधील आजच्या घटनेने रेल्वेच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## बोगस मतदानाचा सूळसुळाट? मालेगावात आढळले एकाच ठिकाणी २०० पेक्षा जास्त मतदान कार्ड

दैनिक आपला विदर्भ

**मालेगाव/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आज (१५ जानेवारी) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. अशातच महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मालेगावात एकाच ठिकाणी २०० पेक्षा जास्त मतदान कार्ड सापडल्याची घटना घडलीय. इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान कार्ड सापडून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. शिवाय हे मतदान कार्ड बोगस असल्याचा संशय देखील बळावला आहे.

मिळलेल्या माहितीनुसार, मतदान केंद्राला लागूनच एका घरात हे मतदान कार्ड सापडले आहे. दरम्यान, मतदान कार्डवर संशय आल्यावर प्रशासनाकडून कारवाई सुरू करण्यात आली असून याबाबत अधिक तपास सुरु करण्यात आला आहे. कार्ड जप्त करून पंचनामा सुरू करण्यात आला असून या कार्ड संदर्भात निवडणूक अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे. तर या मतदार कार्डचा उमेदवाराकडून जागेवरच पंचनामा करण्याची मागणी करण्यात येत आहे.दुसरीकडे, मालेगाव महापालिकेसाठी आज मतदान होत आहे. मालेगाव पूर्व भागातील बडी हायस्कूल येथे प्रभाग क्रमांक १५ व १७ मधील तब्बल ३० ते ४० मतदान केंद्र आहेत. त्यामुळे मतदारांना केंद्र शोधण्यास अडचण निर्माण होत आहे. यावर मार्ग म्हणून शहरातील काही तरुणांनी आपल्या हाताने या मतदान केंद्राचा नकाशा तयार करत येणाऱ्या प्रत्येक मतदाराची मदत करत त्यांना मतदान केंद्र शोधून देत आहे.मालेगाव महानगरपालिका निवडणूक मतदार यादीत मोठा घोळ असल्याने मतदानाची टक्केवारी कमी होत आहे. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. मात्र मालेगावकर जनतेने मतदानाची टक्केवारी वाढवावी असे आवाहन इस्लाम पार्टीचे माजी आमदार आसिफ शेख यांनी केले. मालेगाव महापालिका निवडणुकीसाठी इस्लाम पार्टीने समाजवादी पार्टीसोबत युती करत 'मालेगाव सेक्युलर फ्रंट' नावाने निवडणूक लढवली होती.

# 'हिंद-दी-चादर'च्या जयघोषाने दुमदुमणार नांदेड !

## विद्यार्थ्यांच्या 'प्रभात फेरी'तून आजपासून जनजागृती मोहीम
## चिमुकल्या विजेत्यांचा मुख्य सोहळ्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार सन्मान

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** धर्म, सत्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणारे 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे ३५० वे शहीदी समागम वर्ष ! या ऐतिहासिक पर्वाचे औचित्य साधून, श्री. गुरू तेग बहादूर साहिबजींचा गौरवशाली इतिहास, त्यांच्या त्यागाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न 'प्रभात फेरी'च्या माध्यमातून शिक्षण विभाग करत आहे. प्रभात फेरी गुरूवार पासून (दि.१६ ते २३ जानेवारी) जिल्हाभरातील शाळांमधून निघणार असल्याचे शिक्षण विभागाने सांगितले.

नांदेड येथील आसर्जन परिसरातील (मोदी ग्राउंड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्र्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून 'घराघरात आणि मनामनात' हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचे विचार रुजविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

विद्यार्थी होणार 'विचारदूत' केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर कृतीतून इतिहास समजून घेण्यासाठी जिल्हाभरात भव्य प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या हाती असलेले फलक आणि मुखातील जयघोष यामुळे वातावरण भक्तीमय होणार आहे.

याशिवाय, २५ जानेवारीपर्यंत सर्व शाळांच्या नित्य परिपाठात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या शौर्यावर आधारित गीतांचे गायन, त्यांच्या जीवनपटाचा (डॉक्युमेंटरी) विशेष शो आयोजित करण्यात येणार आहे.

**विजेत्यांना 'सुवर्णसंधी'**

**विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव**

देण्यासाठी तालुका, जिल्हास्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तालुकास्तरावर १५ ते १७ जानेवारी दरम्यान चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा होतील. जिल्हास्तरीय महाअंतिम फेरी २० जानेवारी रोजी निवडक विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा 'गुरुग्रंथसाहेबजी भवन', सचखंड पब्लिक स्कूलजवळ, हिंगोली गेट, नांदेड येथे पार पडेल. जिल्हास्तरावर विजेत्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव मुख्य सोहळ्यात (२४ व २५ जानेवारी) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येईल. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊनही सन्मानित केले जाईल. डिजिटल सेवेची साद

hinddichadar350 या ऐतिहासिक सोहळ्याची व्याप्ती वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येत आहे.

नागरिकांनी आणि तरुणाईने hinddichadar350 या हॅशटॅगचा वापर करून कार्यक्रमाशी संबंधित पोस्ट, फोटो आणि रिल्स सोशल मीडियावर शेअर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

अधिक माहितीसाठी: कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच शाळांनी अधिक माहितीसाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगार, शिक्षणाधिकारी (योजना) दिलीप बनसोडे, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याशी ssananded1gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा, असेही त्यांनी कळवले आहे.

## टपाली मतपत्रिकांच्या पेट्या मतमोजणीच्या दिवशीच अभिरक्षा कक्षातून बाहेर काढणार

**मुंबई/प्रतिनिधी :** बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ - २६ अंतर्गत, निवडणूक निर्णय अधिकारी - २१ (प्रभाग क्रमांक २०० ते २०६) यांनी टपाली मतपत्रिकांबाबत दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी सर्व उमेदवारांना पाठविलेले पत्र अनावधानाने प्रसारित झाले होते. पत्र तत्काळ मागे घेण्यात आले असून त्याऐवजी सुधारित पत्र निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार, गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता टपाली मतपत्रिकांच्या पेट्या अभिरक्षा कक्षातून (स्टॉंग रुम) बाहेर काढण्यात येणार नाहीत. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार, टपाली मतपत्रिकेच्या पेट्या मतदान यंत्रासह (ईव्हीएम) मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी अभिरक्षा कक्षातून बाहेर काढण्यात येतील. त्या अनुषंगाने, उमेदवार किंवा उमेदवाराने अधिकृतरीत्या नेमलेले प्रतिनिधी यांनी नमूद केलेल्या वेळेत उपस्थित राहावे, असे सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे. टपाली मतपत्रिकांचे प्रभागनिहाय विलगीकरण देखील त्याचवेळेला करण्यात येणार आहे, असे मुंबई महानगर पालिकेच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.


## शब्दकोडे क्र. 64

आडवे शब्द

१. झी मराठीवरील आणखी एक नायिकाप्रधान मालिका! ४. कडा दुमडलेली करंजी ७. मजेत रेंगाळत १२. इच्छित प्राप्तीची आज्ञा १३. मल्ल १५. हिंदीत पण-परंतु १६. कागदी चलन १७. हिंदी चित्रपटगीतात भेटणारा परमेश्वर १८. अंगावरील बारीक केस १९. पत्त्यातील जोडपे २१. असक्ती २२. लोकनाट्य २४. नामघोष २८. विशेष २९. मृत्तिकाकण ३१. जेमतेम ३३. शिकार ३६. कोळ्यांचा व्यवसाय ३८. शिव शिव ४०. काया व अंत:करण ४३. साडेतीन मुहूर्तांपैकी एक ४५. नवऱ्याची एखादी सवय वा वस्तूही बायकांना हिच्याप्रमाणे वाटू शकते! ४६. वडिलांचे इंग्रजी संबोधन ४७. भूगोलातील एक 'वृत्त' ४८. टॉनिकला आयुर्वेदातील शब्द ४९. शिखराचे टोक ५०. नित्य, सलग ५१. प्रामाणिक ५२. अभिप्राय ५४. निकट, जवळ ५६. पत्र ५८. धाड घालून पिक फस्त करणारा किडा ५९. विनासायास, विनाकारण ६२. छोटे कुबड ६३. पाऊस (हिंदी) ६५. न वापरलेली ६६. इंद्रिय ६७. कंजूष ६९. मागणारा ७०. खून करणे, वध करणे ७३. बिनवासाचे पांढरे फूल ७५. रशिया (हिंदी) ७७. माणूस ७९. स्वप्नरंजनातील पहिला शब्द ८०. सैन्याचा मालपुरवठा ८४. यातनामय जिणे ८५. चार वेदांपैकी एक ८६. यथेच्छ

उभे शब्द

१. पौगंडावस्था २. धांदल, गडबड ३. एक ज्वालाग्रही सुगंधी पदार्थ ४. पानात उजवीकडे वाढले जाणारे पदार्थ, उदा.भाजी, इ. ५. नूतन ६. सिंह ७. रम्य ८. नंतर ९. होडी १०. शिवसेनेतील 'पंत' ११. किल्ल्याभोवतीची भिंत १४. शेवटचा सूर लांबवून बोलणे २०. सुकुमार २१. संधी २३. जनावरांची कत्तल करणारा २५. सोन्याचा धागा २६. नवरा २६अ. चांगला (अनेकदा उपरोधाने वापरला जाणारा शब्द) २७. वस्ती २८. कंड, खुमखुमी ३०. कुटुंब, गोतावळा ३१. छिद्रातून सांडणारे ऊन ३२. धैर्य, धाडस ३४. आशीर्वाद ३५. गप्प बसण्याचे व्रत ३७. मोहक, नशा आणणारे ३९. बारीक झणझण ४०. शोध, माग ४१. चेन्नईचे ब्रिटिशकालीन नाव ४३. परीक्षा घेणे, तपासणे ४४. व्यार्थ जाणारे, निरर्थक ४६. हालचालीवर ठेवलेली नजर ४७. स्वार्थ, हिंदीत अर्थ ४९. सरोज, पंकज ५१. वर्ष ५३. आक्षेप नाही या अर्थी प्रमाणपत्र ५७. पाण्याची जागा, जलाशय ५८. अणकुचीदार ५९. कारण ६०. ज्याप्रमाणे ६१. अनामत, गुंतविलेली रक्कम ६४. सिद्ध ६५. शेळीचे पिल्लू ६६. असाधारण ६८. सापाची एक जात ७१. धोबी ७२. संगीतातील एक राग ७४. उष्ण ७६. एक तारवाद्य ७८. अरण्य ८१. लंकर्णच पण गाढव नाही! ८२. धमकी ८३. पथक, समूह, गट



### शब्दकोडे क्र. 63 चे उत्तर

आडवे उत्तर

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

उभे उत्तर

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हातारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ

# ‘अरुणोदय’ सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाला सुरुवात

## निरोगी पिढीसाठी नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्हा परिषद आरोग्य विभाग व जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने ‘अरुणोदय’ सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाचा भव्य उद्घाटन सोहळा आज जिल्हा रुग्णालय परिसरात उत्साहात पार पडला.

यावेळी बाह्यरुग्ण विभाग परिसरात जिल्हा नर्सिंग कॉलेजच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींनी प्रश्नमंजुषा स्वरूपात सिकलसेल ॲनिमिया विषयक जनजागृती कार्यक्रम सादर केला. जिल्हा आरोग्य अधिकारी मा. डॉ. अमोल गीते यांनी उपस्थित नागरिकांना सिकलसेल आजारासंदर्भात प्रश्न विचारून उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच दि. १५ जानेवारी ते ०७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या ‘अरुणोदय’ विशेष अभियाना ची सविस्तर माहिती देत जनजागृती केली.





जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी सिकलसेल ॲनिमिया आजाराची कारणे, लक्षणे, उपचार पद्धती तसेच वेळेवर तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रंजीत मंडाले यांनी लग्नापूर्वी सिकलसेल तपासणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद करून, निरोगी पिढीसाठी नागरिकांनी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

या अभियानांतर्गत जिल्ह्यातील नागरिकांनी मोफत सिकलसेल तपासणी करून घ्यावी व आरोग्यदायी भविष्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, जिल्हा सिकलसेल समन्वयक सिताराम मोरे, नर्सिंग ऑफिसर उंबरकर, समुपदेशक गाडेकर, जिल्हा नर्सिंग कॉलेजच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी, आरोग्य कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृत्तविशेष...

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ३२वा नामविस्तार दिन वंचितच्या वतीने साजरा

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : शहरातील अंबड चौफुली येथील वंचित बहुजन आघाडी विभागीय जनसंपर्क कार्यालय येथे ३२ वा डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामविस्तार दिना निमित्त नामांतर शहीदांना अभीवादन करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते.यावेळी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्रिशरण,पंचशील ग्रहण करण्यात आले व नाम विस्तारातील शहीद भीम सैनिकांना विनम्र अभिवादन करून ३२ वा डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक राजेंद्र खरात,महिला जिल्हाअध्यक्षा रमाताई होर्शिळ, सम्यक विध्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष सुरज सोनोवने, संजय आदमाने,कामगार आघाडी शहराध्यक्ष राज आदमाने,सत्यपाल गायकवाड,मैनाताई खंडागळे, मायाताई वानखेडे, दिलीप मगर,ता उपाध्यक्ष विलास नरवडे, गौतम पाडमुख,राजु अचलखांब सुरेश आदमाने यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जालन्यात मतदानासाठी बाहेर पडलेल्या मतदारांवर पिसाळलेल्या कुत्र्यांचा हल्ला

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : जालना शहरात मतदानासाठी बाहेर पडलेल्या मतदारांवर एका पिसाळलेल्या कुत्र्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात १० ते १५ नागरिक जखमी झाले असून त्यांच्यावर जालना जिल्हा रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत.

या घटनेबाबत सविस्तर माहिती अशी की, आज १५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास जालना शहरातील सरस्वती भुवन व शनी मंदिर परिसरात तसेच काली मशीद परिसरात मतदानासाठी बाहेर पडलेल्या काही मतदारांवर व नागरिकांवर एका पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक हल्ला केला. एकामागून एक नागरिकांवर हल्ला करत या कुत्र्याने अनेकांना चावा घेतला. काही जणांच्या पायांना गंभीर दुखापत झाली असून एका व्यक्तीच्या हाताची करंगळी तुटल्याची माहिती आहे.

या हल्ल्यात जखमी झालेल्यांमध्ये शिवराज गणेश वेव्हारे, शेख मोबीन, तारेख सुबानी, कृष्णा सुपारकर, नासेर चाऊस, राजश्री कसबे, शेख रीहान, सैय्यद सलादीन, अमिनोदिन शेख, मोहसिन कुरेशी, आसिफ कुरेशी, संगीता अशोक साळवे, स्नेहा श्रीनिवास येमुल, शेख अतिक आदी नागरिकांचा समावेश आहे.

या संदर्भात जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांशी संपर्क साधला असता, एकूण १५ जणांना कुत्र्याने चावा घेतला असून त्यापैकी दोन जणांची प्रकृती गंभीर असल्याची अधिकृत माहिती जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर आशिष देवडे यांनी प्रसारमाध्यमांना दिली आहे.

### जिल्हा युवा पुरस्कारासाठी १९ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक–युवतींमुळे समाजात युवाशक्तीची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. युवकांना मानव संसाधन विकासाचा प्रमुख स्रोत मानले जात असून विकास प्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. या अनुषंगाने राज्याच्या युवा धोरण २०१२ नुसार राज्य व जिल्हास्तरावर युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

मुंबई शहर जिल्ह्यातील पात्र युवक, युवती व संस्थांनी २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीसाठी जिल्हा युवा पुरस्कारासाठी १९ जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन मुंबई शहराचे जिल्हा क्रीडा अधिकारी मार्क धरमाई यांनी केले आहे.

पुरस्कारासाठीचे अर्ज भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल, दुसरा मजला, जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर कार्यालय, धारावी येथे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती–जमाती, आदिवासी भाग, तसेच शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, संस्कृती, कला, क्रीडा, विज्ञान–तंत्रज्ञान, उद्योग, महिला सक्षमीकरण, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध, व्यसनमुक्ती आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक, युवती व संस्थांना जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी ९५९४३६९५६१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## राणी मुखर्जीनं केली चित्रपटसृष्टीत ३० वर्ष पूर्ण, पोस्ट झाली व्हायरल...

**मुंबई/प्रतिनिधी** : अभिनेत्री राणी मुखर्जीनं मनोरंजन क्षेत्रात तीन दशके घालवली आहेत. सोमवारी एका दीर्घ पोस्टमध्ये राणीनं तिच्या प्रवासाबद्दल विचार व्यक्त केला आहे. यामध्ये तिनं सांगितलं “ ३० वर्षे, विचार करणे आश्चर्यकारक आहे. पण हे देखील खरे आहे की, जेव्हा तुम्ही तुम्हाला जे आवडते ते करता, तेव्हा त्या कामाची तुमची भूक आणखी वाढते. ३० वर्षांपूर्वी, मी पहिल्यांदाच सेटवर पाऊल ठेवले. अभिनेत्री बनण्याची कोणतीही योजना नव्हती, मला प्रत्यक्षात आणायचे होते असे स्वप्नही ते नव्हते. ते असे काहीतरी होते ज्यानं मला शोधले. आणि मग मी त्याच्या प्रेमात पडले....” आताही तीन दशके घालवल्यानंतर, राणी अजूनही पहिल्यांदाच कॅमेऱ्यासमोर उभी राहण्याइतकी मोठी होत आहे. तिनं पुढं सांगितलं, “माझ्या मनात अजूनही ती असुरक्षित मुलगी आहे. जेव्हा मी कॅमेऱ्यासमोर उभी राहते, तेव्हा मला असे वाटते की, मी संवाद विसरले आहे.” ती म्हणते, कोणतीही योजना नव्हती, तिनं उत्सुकतेपोटी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवलं.

राणी मुखर्जीनं शेअर केली पोस्ट : राणीच्या या पोस्टमधील मुख्य संदेश काय आहेत ते पाहूया. राणी म्हणते, “राजा की आयेगी बारातनं तिला शिकवलं की, चित्रपटांमध्ये ग्लॅमर नाही तर जबाबदारी प्रथम येते. त्या चित्रपटानं राणीला अभिनेत्री म्हणून घडवले. नव्वदच्या दशकात राणीची कारकीर्द आणखी उजळली. प्रेक्षकांच्या प्रेमानं ती भारावून गेली. प्रेक्षकांच्या मनात हिंदी चित्रपट किती जागा व्यापते, हे तिला समजले. तिला त्या जुन्या काळात परत जायचे होते. साथिया हा चित्रपट राणीच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा होता. अभिनेत्रीच्या मते, तिला पडद्यावर परिपूर्ण व्हायचे नव्हते, मात्र खरे सांगायचे तर, त्या भावनेतूनच ती हम तुम सारख्या चित्रपटांमध्ये तिचे १०० टक्के योगदान देऊ शकली. साथिया आणि हम तुममधील दोन महिला पात्रांच्या परस्परविरोधी स्वभावामुळं राणीला अभिनेत्री म्हणून अधिक मजबूत बनवले. २००० हे वर्ष राणीसाठी आणखी एका कारणासाठी महत्त्वाचे आहे आणि ते म्हणजे, संजय लीला भन्साळींचा ब्लॅक याच काळात प्रदर्शित झाला. राणीच्या शब्दात, “ब्लॅकनं मला शिकवले आहे की, शांततेतही एक आवाज असतो आणि अभिनय फक्त करण्याबद्दल नाही, तर तुम्हाला त्या पात्राचे ऐकण्याची देखील आवश्यकता आहे.”



सायप्रसच्या लार्नाका प्रदेशातील मेन्यू सरोवरातून एक फ्लेमिंगो पक्षी उडतो.

## भारतरत्न सचिन तेंडूलकरनं बजावला मतदानाचा हक्क

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये आज सकाळपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. मंगळवारी निवडणूक प्रचार संपल्यानं, आता सर्व पक्षांचं लक्ष मतदारांवर आहे. सुमारे ७-८ वर्षानंतर होत असलेल्या या महापालिकेच्या निवडणुकांमध्ये सकाळपासूनच मतदारांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. विषेशत: राज्याची राजधानी असलेल्या मुंबईत अनेक दिग्गज आपला मतदानाचा हक्क बजावत आहेत. अशातच क्रिकेटचा देव भारतरत्न सचिन तेंडूलकरनंही सकाळीच आपला मतदानाचा हक्क बजावला.




मतदानानंतर काय म्हणाला सचिन : मुंबईतील बीएमसी निवडणुकीसाठी मतदान करण्यासाठी दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर सकाळी ९ च्या सुमारास मतदान केंद्रावर पोहोचला. बीएमसी निवडणुकीत मतदान केल्यानंतर सचिन तेंडुलकरनं शाई लावलेलं बोट दाखवलं. तो म्हणाला, ”ही एक अतिशय महत्त्वाची निवडणूक आहे. यामुळं आपल्याला आपल्या मतांद्वारे आपलं मत व्यक्त करण्याची संधी मिळते. प्रत्येकाने बाहेर येऊन मतदान करावं.”

महायुती विरुद्ध महाआघाडी असं चित्र : देशातील सर्वात श्रीमंत महापालिका असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रणाच्या लढाईवरुन मुंबईत राजकारण शिगेला पोहोचल्याचं पाहायला मिळालं. २०१७ मध्ये इथं शेवटची निवडणूक झाली होती. यावेळी, निवडणुकीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे कारण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे जवळजवळ दोन दशकांनंतर मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर एकत्र आले आहेत. शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यातील या युतीकडे मराठी मतांचं ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न म्हणून पाहिलं जात आहे. भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुती ज्यामध्ये शिवसेना (एकनाथ शिंदे गट) देखील समाविष्ट आहे, या युतीला आव्हान देत आहे.

१६ जानेवारीला होणार मतमोजणी : राज्य निवडणूक आयोगाच्या मते, या निवडणुकीत एकूण ३४.८ कोटी मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. २९ महानगरपालिकांमधील ८९३ वॉर्डामधील २८६९ जागांसाठी १५९०८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. राज्यभरातील ३९,०९२ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. मतदान सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत होईल आणि मतमोजणी १६ जानेवारी शुक्रवारी होणार आहे.

अनेक मुद्द्यावरुन निवडणुक चर्चेत : मतदान सुरळीत पार पडावं यासाठी राज्य सरकारनं संबंधित महानगरपालिका क्षेत्रात १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. खासगी आणि सरकारी संस्थांना कर्मचाऱ्यांना मतदानासाठी दोन ते तीन तासांची सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त, मतदान प्रक्रिया विस्कळीत होऊ नये यासाठी सर्व शहरांमध्ये शाळा बंद राहतील. ही महानगरपालिका निवडणूक स्थानिक मुद्द्यांपुरती मर्यादित नसून मराठी ओळख, नेतृत्व आणि युती राजकारणासह रस्ते, पाणी, स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक आणि शहरी विकास यासारखे मुद्दे देखील मतदारांच्या निर्णयांवर प्रभाव टाकत आहेत.

## उद्धव ठाकरे यांचे विधान आचारसंहिता भंग करणारे ?

### मंत्री ॲड. आशिष शेलार यांचा सवाल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : एखादा सराईत असतो त्या पद्धतीने उद्धव ठाकरे हे वारंवार निवडणुकीच्या दिवशीच पत्रकार परिषदा घेतायेत, त्यांच्या पत्रकार परिषदांना परवानगी होती का? त्या पत्रकार परिषदेत त्यांनी निवडणूक यंत्रणेवर बोट ठेवलंय, त्यात त्यांचा राजकीय हेतू त्यांना साध्य करायचा आहे.

त्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेले विधान हे निवडणूक आयोगाने पाहावं लागेल. हे विधान आचारसंहितेचा भंग आहे का? असा आक्षेप ॲड आशिष शेलार यांनी आज माध्यमांशी बोलताना नोंदवला.

उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेला मंत्री आशिष शेलार यांनी पत्रकार परिषद घेऊन उत्तर दिले. यावेळी ते म्हणाले की, मुंबईत ज्यावेळेला मतदार जोमाने मतदान करतायेत, दीड वाजेपर्यंत ३० टक्के पार झालंय. मतदार, या यंत्रणा लोकशाहीवर विश्वास मजबुतीने ठेवून सहभागी होतायेत, त्यावेळेला हे आरडाओरडा का? ही अडकाठी का? हा स्पीडब्रेकर का? हा गतिरोध का? उद्धव ठाकरे यांची पत्रकार परिषद आणि त्यांनी केलेले आरोप हे निवडणूक यंत्रणा, निवडणुकीत सहभागी होणारे अधिकारी, मतदार यांना गतिरोध आहेत का? हा स्पीडब्रेकर आहे का? त्याच्यामागचा हेतू काय? ते प्रेस कॉन्फरन्स का घेतायेत? निवडणूक आयोगाने यावर लक्ष ठेवलं पाहिजे आणि हे वारंवार करतायेत, असे शेलार म्हणाले.

पहिल्यांदा दोन्ही ठाकरे बंधूंनी आरोप केला की, मतचोरी झाली. मग मतचोरीवरून मतदार यादीतल्या नावांची चोरी झाली. मग मतदार यादीतल्या नावांच्या चोरीनंतर, मतदार नोंदणीच्या असलेल्या एजन्सी आणि कंपन्या यामध्ये चोरी झाली. तेवढ्यावर थांबले नाहीत, मग दुबार मतदारी चोरी झाली हा आरोप केला. तेवढ्यावर थांबले नाहीत, मग मतदान यंत्रात चोरी आहे सांगितलं. तेवढ्यावर थांबले नाहीत, मग मतदान केंद्र निवड प्रक्रियेमध्ये चोरी आहे सांगितलं. तेवढ्यावर थांबले नाहीत, मग मतदान प्रक्रियेतल्या अधिकाऱ्यांच्या निवडीमध्ये चोरी आहे सांगितलं. तेवढ्यावर थांबले नाहीत, मग प्रचार करण्याच्या नियम नियमावलीमध्ये चोरी आहे असं सांगितलं. तेवढ्यावर थांबले नाहीत, मग पाडू या यंत्रणेत चोरी आहे सांगितलं. तेवढ्यावर थांबले नाहीत, आता शाईवर चोरी आहे सांगितलं.



या एवढ्या चोऱ्या नाहीत. हा त्यांच्या बुद्धीतील हेराफेरीचा प्रकार आहे. यांच्या राजकीय मेंदूमध्ये केमिकल लोचा झाला आहे. बुद्धीतली हेराफेरी आहे, चोरी नाही! यांचे सल्लागार सडके आणि हे रडके, अशी अवस्था यांची झाली आहे, असा आरोपही यांनी केला.